दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १९९ वा शनिवार दि.२५ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Legrand HAVELLS Finolex PHILIPS SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018


# १० लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होणार?




नवी दिल्ली : वृत्तसंस्था-केंद्र सरकारचा अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या १ फेब्रुवारीला जाहीर करणार आहेत. या अर्थसंकल्पात केंद्र सरकारकडून कोणत्या घोषणा केल्या जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्राप्तिकराच्या कर रचनेत आणि रिबेट संदर्भात काही घोषणा होते का याकडे देखील पगारदारांचे लक्ष लागले आहे. केंद्र सरकार २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात १० लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याचा निर्णय घेऊ शकते, असे बिझनेस स्टँडर्डने म्हटले आहे.

केंद्र सरकार टॅक्स रिजीममध्ये मोठे बदल करुन १० लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करु शकते, अशी शक्यता आहे. याशिवाय १५ लाख रुपये ते २० लाख रुपये दरम्यानच्या उत्पन्नावर २५ टक्के कर लावू शकते. केंद्र सरकार या दोन पर्यायांवर विचार करत आहे. सध्या १५ लाखांवरील उत्पन्नावर ३० टक्के प्राप्तिकर आकारला जातो.

केंद्र सरकारने या प्रकारचा निर्णय घेतल्यास त्यांना ५० हजार कोटी ते १ लाख कोटी रुपयांपर्यंतचा महसूल गमवावा लागू शकतो. शहरातील नागरिकांची क्रयशक्ती वाढावी आणि आर्थिक प्रगतीचा किंवा जीडीपीच्या वाढीचा जो वेग मंदावला आहे, त्याला गती मिळावी म्हणून हा निर्णय घेण्याबाबत सरकार विचार करु शकते. २०२४-२५ या आर्थिक वर्षात दुस-या तिमाहीत जीडीपीचा दर ५.४ टक्के होता.

सीबीडीटीचे माजी सदस्य आणि पीडब्ल्यूसीचे सल्लागार अखिलेश रंजन यांच्या मते १५ लाख ते २० लाखांच्या उत्पन्नादरम्यानच्या २५ टक्के प्राप्तिकर आकारणीचा निर्णय सरकारला देखील फायदेशीर ठरु शकतो.

# मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूरच्या नविन इमारतीचे-मा. ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन



नागपूर / प्रतिनिधी : - महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत असलेल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूरच्या नविन इमारतीचे उद्घाटन मा.ना. पंकजाताई मुंडे, मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी डॉ. हिमांशू पाठक, सचिव (कृषि अनुसंधान आणि शिक्षण) तथा महानिदेशक, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली तसेच डॉ. एन. रामास्वामी, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य हे होते. डॉ. नितीन पाटील, कुलगुरू, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी प्रमुख अतिथी मा. ना. पंकजाताई मुंडे आणि इतर मान्यवरांचे महाविद्यालयामध्ये स्वागत केले. मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर विदर्भातील मत्स्यव्यवसाय शिक्षण, संशोधन आणि विस्तार क्षेत्रात कार्य करणारी एकमेव संस्था असून महाविद्यालयामार्फत शेतकऱ्यांना मत्स्यव्यवसाय व मत्स्य पालन याविषयीचे प्रशिक्षण कार्यक्रमही राबविले जातात असेही यावेळी नमूद करण्यात आले. महाविद्यालयाच्या नविन इमारतीमधील तळमजल्याचे बांधकाम पूर्ण झाले असून त्याकरीता रू. ५.५० कोटी इतका खर्च झाल्याचे आणि इमारतीच्या उर्वरीत बांधकामाकरीता रू. २१.४० कोटी इतका निधी शासन स्तरावरून अपेक्षित असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मा.ना. पंकजाताई मुंडे यांनी महाविद्यालयातील मत्स्य अभियांत्रिकी, मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान इत्यादी विभागांमधील शैक्षणिक आणि विस्तार सुविधांचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे महाविद्यालयाने विकसीत केलेल्या फिरता मत्स्य विक्री संच तसेच माशांचे धुरीकरण संयंत्र या तंत्रज्ञानाविषयी माहिती जाणून घेतली. महाविद्यालयाच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यांचे बांधकाम, मुलांचे वसतीगृह तसेच मुलींचे वसतीगृह याकरीता निधीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावे असे निर्देश यावेळी मा. मंत्री महोदयांनी दिले.



सदर उद्घाटनाप्रसंगी डॉ. प्रविण कुमार देवरे, आयुक्त पशुसंवर्धन, डॉ. राघवेंद्र भट्टा, उपमहानिदेशक, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे डॉ. एस. व्ही. उपाध्ये, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (पशु विज्ञान शाखा), डॉ. एन. व्ही. कुरकुरे, संचालक संशोधन, डॉ. एस. डब्ल्यु. बोंडे, अधिष्ठाता (मत्स्य विज्ञान विद्या शाखा), श्रीमती मोना ठाकूर, कुलसचिव, श्रीमती मनिषा शेंडे, नियंत्रक आणि श्री. आरीफ शेख, विद्यापीठ अभियंता इत्यादी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत तेलवेकर आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी कार्यक्रमाच्या यशस्वीकरीता विशेष परिश्रम घेतले.

# पोलीस पाटलांनी नेहमी सत्याच्या बाजुने रहावे : माजी मंत्री आ.संजय बनसोडे


## पोलिस पाटलांच्या मानधन वाढीसाठी प्रयत्न करणार





उदगीर :प्रतिनिधि-उदगीर : गावातील तंटे कमी करण्यासाठी शासनाचा प्रतिनिधी म्हणून राज्य शासनाने पोलीस पाटलांची नियुक्ती केली. पोलीस पाटील हा गाव गाड्यातील महत्वाचा घटक असुन गावातील वादात कोणावरही अन्याय होणार नाही यासाठी प्रयत्नशील रहावे. पोलीस पाटलांनी आपल्या गावात जात - पात , जवळचे दुसरचे व पक्ष असा भेदभाव न करता सत्याच्या बाजूने राहून आपली सेवा बजावावी असे मत माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. उदगीर व जळकोट तालुक्यातील पोलिस पाटलांच्या वतीने उदगीर येथील शासकीय विश्रामगृह येथे महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलीस पाटील संघटना लातूरच्या वतीने आयोजीत सत्कार सोहळ्यात बोलत होते. यावेळी पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष भालचंद्र शेळके, दिलीप पाटील, हनुमंत शेळके, सोमेश्वर पारगे, एकनाथ कसबे, प्रा. शाम डावळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, माजी नगरसेवक अनिल मुदाळे, अंकुश वाघे, दत्ता श्रीमंगले, ओंमकार कवठाळे, ज्योती बिरादार, विश्वास नरले पाटील, धनराज पाटील, छावाचे दत्ता पाटील आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, पोलीस पाटलांच्या मानधन वाढीसाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटुन आपण शासन दरबारी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. परवाच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत त्या - त्या गावातील पोलीस पाटलांची भुमिका महत्वाची होती. माझ्या या विधानसभेतील ऐतिहासिक विजयामध्ये पोलीस पाटलांचेही योगदान राहिले आहे. त्यामुळे त्यांच्या सर्व समस्या आपण प्राधान्याने सोडवणार असल्याचे आ.बनसोडे यांनी सांगितले. यावेळी उदगीर व जळकोट तालुक्यातील पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वेतील समस्यांबाबत (आरपीआय) शिष्टमंडळाने घेतली मध्यरेल्वे प्रशासनाच्या विभागीय व्यवस्थापकांची भेट



नवी मुंबई / के. एच. हनवते :- नवी मुंबई रेल्वे स्थानक आणि परिसरातील रेल्वे प्रवाशांच्या समस्यांबाबत रिपब्लिकन पक्षाच्या वतीने नवी मुंबईतील सर्व रेल्वे स्थानकांमध्ये १५ जानेवारी रोजी जनजागृती आणि स्वाक्षरी मोहीम आयोजित केली होती. लोकलच्या फेऱ्या वाढवणे, महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांची जास्त वाढवणे, रेल्वे स्थानक परिसरात स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वयंचलित पायऱ्या व लिफ्टची व्यवस्था करणे या नागरी समस्यांबाबत मध्य रेल्वे च्या विभागीय व्यवस्थापक आणि लोहमार्ग पोलीस आयुक्त रविंद्र शिसवे यांची रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन नागरी भेट घेऊन नागरी समस्या मांडल्या. या सर्व समस्यांबाबत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेऊन समस्या सोडविण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले या शिष्टमंडळात रिपब्लिकन पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे, सरचिटणीस एल. आर. गायकवाड, कार्याध्यक्ष विजय कांबळे, उपाध्यक्ष टिळक जाधव, प्रमुख संघटक नारायण मोरे, जिल्हा प्रवक्ते सचिन कटारे, ऐरोली विधानसभा प्रमुख महेश कांबळे, बेलापुर प्रमुख सुनील रसनभैरे, बालाजी कांबळे, बाबू गायकवाड, धम्मपाल निखाडे, शानु गायकवाड आदिसह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा लातूर जिल्हा दौरा

## स्वागतासाठी शाल, पुष्पगुच्छ न आणण्याचे आवाहन



लातूर :- राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे २५ व २६ जानेवारी २०२५ रोजी दोन दिवसांच्या लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. पालकमंत्री ना. भोसले यांचे २५ जानेवारी रोजी तुळजापूर येथून दुपारी १.३० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. दुपारी ३ वाजता शासकीय विश्रामगृह येथे ते सार्वजनिक बांधकाम विभागाचा आढावा घेतील. दुपारी ३.३० वाजता पदाधिकाऱ्यांच्या भेटी घेतील. सायंकाळी ५ वाजता लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आयोजित 'संविधान गौरव सभा' कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील. सायंकाळी ६ वाजता औसा शहराकडे प्रयाण करतील. सायंकाळी ६.३० वाजता औसा येथे विधानसभा सदस्य अभिमन्यू पवार यांच्या जन्मेजय निवासस्थानी आगमन होईल व राखीव. त्यानंतर सोयीनुसार लातूरकडे प्रयाण व शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल.

प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित सोहळ्याला पालकमंत्री ना. भोसले उपस्थित राहतील. सकाळी १०.१० वाजता जिल्हा क्रीडा संकुल परिसरात आयोजित 'हिरकणी हाट २०२५' या ग्रामीण भागातील महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे विक्री व प्रदर्शनाचे त्यांच्या हस्ते उद्घाटन होईल. सकाळी १०.२० वाजता शासकीय वाहनांचे लोकार्पण, तसेच अभया योजना कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतील. सकाळी ११.४५ वाजता लातूर एमआयडीसी येथील जे.एस. पी.एम. विद्यालय कॅम्पस येथे महाराष्ट्र कॉलेज ऑफ नर्सिंग इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १२.४५ वाजता डॉ. अर्चना पाटील-चाकूरकर यांच्या देवघर निवासस्थान येथे आगमन व राखीव. दुपारी १.१० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. दुपारी ३ वाजता लातूर विमानतळ येथून हेलिकॉप्टरने साताराकडे प्रयाण करतील.

स्वागतासाठी शाल, पुष्पगुच्छ आणू नका; पालकमंत्र्यांचे आवाहन कोणत्याही जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेल्यानंतर स्वागताला शाल, पुष्पगुच्छ न स्वीकारण्याचा निर्णय मी घेतला आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्यानंतर पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच अधिकाऱ्यांनी भेटीसाठी येताना शाल, पुष्पगुच्छ आणू नयेत, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले आहे.

## संपादकीय....

# महाराष्ट्राच्या विकासाचे पाऊल

कॅनडा, मेक्सिको या शेजारी देशांपाठोपाठ आता भारताचा समावेश असलेल्या 'ब्रिक्स' देशांवरही व्यापार कर लादण्याची धमकी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) आणि पर्यावरणविषयक महत्त्वाच्या असलेल्या पॅरिस हवामान करारातून बाहेर पडण्याचा अविचारी निर्णयही त्यांनी घेतला आहे. त्यांच्या या धक्कादायक पवित्र्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी दीड टक्क्याहून अधिक कोसळून, ७ महिन्यांपूर्वीच्या नीचांकावर घसरला. तरीही जागतिक व्यापार तेजीत असून, २०२४ मध्ये या व्यापाराचा आकडा ३३ ट्रिलियन डॉलर इतका होता. तीन चतुर्थांश आंतरराष्ट्रीय व्यापार विविध प्रकारच्या वस्तू व मालाचा असून, त्यातील ७० टक्के माल कारखान्यांत तयार झालेला आहे. या उत्पादित मालाच्या व्यापारातील २ टक्के हिस्सा भारताचा असून, तो वाढवण्यासाठी निर्यातप्रधान अशा उद्योगांत परकीय भांडवल आकर्षित करणे, हा एक मार्ग आहे. त्यासाठी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अधिक प्रमाणात सामील होणे आवश्यक आहे. सध्या विदेशी गुंतवणूक खेचण्यासाठी देशादेशांत स्पर्धा सुरू आहे. महाराष्ट्र हा युरोपच्या बहुतेक देशांपेक्षा मोठा असून, भारतातील ते एक अग्रेसर औद्योगिक राज्य आहे. स्वित्झर्लंडमधील दावोस परिषद ही जागतिक व्यापाराची पंढरी असून, यामध्ये एकट्या महाराष्ट्रात १५ लाख ७० हजार कोटी परदेशी गुंतवणुकीचे झालेले करार ही राज्यासाठी ऐतिहासिक कामगिरी आहे. सोळा लाखांवर नवे रोजगार त्यातून निर्माण होण्याची आशा आहे. आजवरच्या परिषदांमधील हे सर्वाधिक करार आणि गुंतवणूक ठरली आहे. मंगळवारी पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुमारे पाच लाख कोटी रुपये गुंतवणुकीसाठीचे सामंजस्य करार केले.

सर्वात मोठी, तीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक जेएसडब्ल्यू उद्योगसमूहाने केली. पोलाद, सिमेंट, लिथियम, आयर्न बॅटऱ्या, सोलर वेफर, सेल मॉड्यूल्स, पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्रांत जेएसडब्ल्यू भांडवल ओतणार आहे. नक्षलग्रस्त गडचिरोली ही देशाची 'स्टील सिटी' म्हणून ओळखली जावी, असे या जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या फडणवीस यांचे प्रयत्न आहेत. धातू, संरक्षण, विद्युतवाहन अशा विविध क्षेत्रांत महाराष्ट्राकडे भांडवल येत आहे. पेप्सिको नाशिकमध्ये उत्पादन मूल्य साखळी उभारणार असून, याचा शेतकऱ्यांना त्याचप्रमाणे लघुउद्योजकांना फायदा होणार आहे. मास्टरकार्डने पुणे येथील तांत्रिक केंद्र पुन्हा सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारला कळवला आहे. तसेच 'फ्युएला' ही कंपनी राज्यातील ५ हजार तरुणांना कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल मार्केटिंग आणि बिझनेस ॲनॅलिटिक्स या क्षेत्रांत प्रशिक्षित करणार आहे. शिवाय रिलायन्स, ॲमेझॉन या कंपन्यांनीही सहकार्याचा हात पुढे केला आहे. थोडक्यात, पोलादासारखे पारंपरिक उद्योग ते एआयपर्यंत विविध क्षेत्रे बहरणार असून, काळाप्रमाणे बदलण्याची गरज आहेच. जेव्हा इतके विक्रमी भांडवल खेचले जाते, त्यावरून राज्य सरकारच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्राचे ब्रँड मार्केटिंग उत्तम प्रकारे केले असल्याचे स्पष्ट होते. स्वतः मुख्यमंत्री फडणवीस यांना आधुनिक जगतातील नवनवीन उद्योग व तंत्रज्ञानाची क्षेत्रे माहीत असून, ते अग्रगण्य कंपन्यांसोबतच्या वाटाघाटी प्रभावीपणे करण्यात निष्णात आहेत. महाराष्ट्रातील शेती किफायतशीर नसून, त्याचा मोठा फटका या क्षेत्राला बसताना दिसतो. कारखानदारी क्षेत्राचा विकास झाल्यास, तेथे व बड्या प्रकल्पांसाठी उत्पादन घटक बनवण्याच्या छोट्या छोट्या उद्योगांत असंख्य लोकांना रोजगार मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.


२०१४–१९ या आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या टर्ममध्ये फडणवीस तीनवेळा दावोस परिषदेत सहभागी झाले. त्यांच्याच कार्यकाळात औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर आला. राज्याची अर्थव्यवस्था १ लाख कोटी डॉलरवर नेण्यासाठी राज्यात प्रचंड प्रमाणात भांडवल येणे गरजेचे आहे. गुंतवणूक आणताना वा पायाभूत सुविधांचा विकास करताना, प्रादेशिक समतोल कसा राखला जाईल, यावर मुख्यमंत्र्यांचा यथायोग्य भर आहे. केवळ विकसित भागांकडेच लक्ष दिल्यास मागास भागांची उपेक्षा होते, याचे भान दाखवले जात आहे, ही चांगलीच बाब. २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दावोसला शिष्टमंडळ गेले होते. त्यावेळी ३ लाख कोटी रुपयांवर गुंतवणुकीचे करार करण्यात आले. त्यामुळे २ लाख तरुणांना रोजगार मिळेल, असा दावा करण्यात आला होता. अदानी समूहानेच ५० हजार कोटी रुपये गुंतवणूक करण्याचा करार केला. तर त्यावेळी माहितीतंत्रज्ञान, ग्रीन हाड्रोजन, डेटा सेंटर, लॉजिस्टिक्स, ऑटोमोटिव्ह, कृषी उत्पादने या क्षेत्रांसाठीचे करारमदार करण्यात आले होते; मात्र काही भारतीय कंपन्यांसोबत केलेले करार दावोसला झाले, असे दाखवण्यात आल्याची टीका झाली होती.

शिष्टमंडळावरून काही आरोप–प्रत्यारोपही झाले. या आरोपात सत्यतेपेक्षा राजकारणच अधिक होते. पण, जे काही विविध करार झाले, त्यापैकी किती प्रत्यक्षात आले, हे पाहण्याची गरज आहे. अनेकदा पाठपुराव्यात सरकार कमी पडत असते किंवा प्रशासनाचा अडवणुकीचा कारभार मारक ठरत असतो. मूलभूत पायाभूत सोयी–सुविधांची वानवा, उद्योग संस्कृतीचा अभावही कारणीभूत ठरत असतो. दुसरी बाब म्हणजे, राज्यातील विजेचे दर जास्त आहेत. पुण्यासारख्या शहरातही अनेकदा वीज जाते. ग्रामीण भागात राजकीय खंडणीखोरांच्या उपद्व्यापामुळे उद्योजकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्याच हेतूने अनेकदा आंदोलने केली जातात. शिवाय कुठलेही आंदोलन झाले की, उद्योगांचा संबंध असो–नसो, कारखान्यांच्या कार्यालयांवर दगडफेक केली जाते. सततच्या 'रास्ता रोको'मुळे माल बाजारपेठेत पाठवताना वा निर्यात करताना अडथळे येतात. उद्योगधंदे हे बेकार हातांना काम देत असतात. त्यामुळे उद्योगपती म्हणजे चोरच, असे समजून त्यांच्याकडून वसुली करण्याची कृती वेळीच थांबली पाहिजे. या विदेशी गुंतवणुकीतून नवे उद्योग उभारण्याचे मोठे आव्हान आहे,

त्यासाठी सरकारनेच आता पुढाकार घेत हे अडथळे दूर तर केलेच पाहिजेत, प्रशासनही गतिमान केले पाहिजे. निकोप उद्योग संस्कृती उभी राहिल्यास महाराष्ट्राच्या विकासाचे ते नवे पाऊल ठरेल.

# स्वतःला बदलण्यासाठी


अनेक कौटुंबिक समस्या घेऊन लोकं जेव्हा समुपदेशनाला येतात तेव्हा बहुतांश घरातील लोकांची समस्या असते ती म्हणजे घरातील नातेवाइकांचा अबोला! कुटुंब मोठं असो छोटं असो रुसवे–फुगवे, वादविवाद, मतभेद हे असतातच. अनेक समजूतदार घरामध्ये, चांगले विचारविनिमय असलेल्या घरातील सदस्यांमध्ये घरातील सर्व समस्या, अडचणी एकमेकांना विश्वासात घेऊन, धीर देऊन, आधार देऊन, मदत करून, चर्चा करून सोडवल्या जातात. तर अनेक घरांमध्ये जिथे लोकांची मनस्थिती कमकुवत आहे, विचार करण्याची, परिस्थिती समजावून घेण्याची कुवत नाही त्याठिकाणी एकमेकांना दोष देऊन, कोणावरही खापर फोडून, एकमेकांना टोमणे मारून, अबोला धरून, भांडणे करून, लपवा–छपवी करून, निंदा–नालास्ती करून, अधिक गैरसमज पसरवून घरातलेच लोक घरातल्या आपल्याच माणसांना बदनाम करण्यात धन्यता मानतात.



ज्या घरामध्ये सतत एकमेकांना अंधारात ठेवलं जातं, सत्य लपवलं जातं, एकमेकांशी व्यवस्थित संवाद साधला जात नाही, सतत दिशाभूल केली जाते, माघारी बोललं जातं, जिथे सतत घरात राजकारण, कुटनीती, संभ्रम, संशय आरोप–प्रत्यारोप याच गोष्टींचा साम्राज्य असतं ते घर आणि ती माणसं कधीच प्रगती करू शकत नाहीत. हे समुपदेशनाच्या प्रकरणातून लक्षात येते. अनेक घरातील लोकांना आपल्याशी कोणी अबोला धरला, व्यवस्थित बोललं नाही, चांगलं वागलं नाही, आपल्याला एकटं पाडलं आहे याचा खूप त्रास होतो. जे लोकं मनाने हळवे असतात, भावनांशील असतात, सगळ्यांना आपले जवळचे मानणारे आणि नात्यावर विश्वास ठेवणारे असतात, ज्यांना कुटुंब तुटू नये असं वाटतं असतं त्यांना असे चुकीचे वाईट अनुभव आल्यावर खूप त्रास होतो, मनस्ताप होतो आणि त्यांच खूप खच्चीकरण होत आहे अशी त्यांची तक्रार असते. घरातलीच लोकं आम्हाला वेगळी, परकी वागणूक देतात, घरात ग्रुप केलेले आहेत, घरात एकोपा, एकजूट नाहीये याचा त्यांना त्रास होत असतो. यामुळे घरात सतत धुसफूसणारं वातावरण असतं. मनमोकळे, प्रसन्न, आनंदी कोणीच नसतं, सगळेच मनात कुढत असतात आणि तरीही एकमेकांना त्रास देत असतात. अनेक लोकं सांगतात की आमच्याच घरात काय चाललंय ते आम्हाला माहिती नसतं. काही घडो अथवा न घडो अचानक आम्हाला वेगळं एकटं पाडलं जातं, काही सदस्य आमच्याशी बोलणं बंद करतात, आमचे फोन घेत नाहीत, समोर आले तरी आम्हाला प्रतिसाद देत नाहीत, मोबाईलवर आम्ही कितीही चांगलं बोलण्याचा प्रयत्न केला, त्यांना चांगला मेसेज पाठवला तरी त्यातून आम्हाला उलटंच बोललं जात, अर्थाचा अनर्थ केला जातो किंवा काहीच प्रतिसाद मिळत नाही.

आजकाल तर मोबाईलला एकमेकांना ब्लॉक करणे, ब्लॅक लिस्टला टाकणं यामुळे मनस्तापात अधिक भर पडली आहे. आता लोकं अशी का वागतात हे समजावून घेऊ आणि त्यांच्या या वृत्तीचा आपण का आणि किती त्रास करून घ्यायचा? हे आपल्यावर कसं अवलंबून आहे हे पण पाहू. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे आहे ज्यांना तुम्ही आपलं म्हणत आहात, नातेवाईक म्हणत आहात, जवळचे समजत आहात, ज्यांच्यात तुम्ही गुंतलेले आहात ते खरंच तुम्हाला आपलं मानतात का? ते तुमचे आहेत का? त्यांना पण तुमच्याबद्दल तेवढंच प्रेम, ओढ, आदर, आपुलकी, जिव्हाळा आहे का? हे सगळं फक्त बोलून आहे की कृतीतून ते सिद्ध होत आहे हे जाणून घ्या. कोणतंही नातं दोन्हीकडून सारखं योगदान असेल तरच टिकू शकत, बहरू शकतं हे व्यवस्थित तपासून त्या व्यक्तीला तेवढंच महत्त्व द्या. जे तुम्हाला आपलं मानत नाहीत त्यांच्याकडून अपेक्षा करणं पूर्णपणे सोडून द्या. तुमच्याशी कोणी कोणत्याही कारणास्तव बोलत नाहीये किंवा बोललं तरी त्याच्या बोलण्यात राग, द्वेष, तिरस्कार, वाद घालण्याची वृत्ती, ओरडाआरडा करून स्वतःचं खरं करण्याची प्रवृत्ती आहे, अशा लोकांना शांतपणे एक–दोन वेळा समजावून घेण्याचा आणि समजावून सांगण्याचा प्रयत्न करून बघा. त्यानंतर पण त्यांच्यात काहीच सुधारणा होत नसेल तर ते आणि त्यांचा स्वभाव बदलण्यापलीकडे आहे असं समजून विषय सोडून द्या, पण स्वतःला त्रास करून घेऊ नका. अशा लोकांच्या गावी पण नसतं की त्यांच्या वागणुकीमुळे तुम्हाला किती त्रास होत आहे. लोकं असं का वागतात हे पहिले समजावून घ्या. असे वागणाऱ्या लोकांची शैक्षणिक पात्रता प्रथम लक्षात घ्या. शिक्षणाने माणसाचे व्यक्तिमत्त्व घडते, विचार, आचार प्रगल्भ होतात, सकारात्मक विचारशैली जागृत होते. त्या व्यक्तींचा सामाजिक आयुष्य लक्षात घ्या. ते समाजात कोणत्या स्थानावर आहेत, किती आणि कशा प्रकारच्या बुद्धिमान, कर्तृत्ववान, अनुभवी आणि हुशार लोकांच्या सहवासात ते कामं करतात, बोलतात, राहतात हे जाणून घ्या. अशा वागणाऱ्या लोकांचं बालपण, पूर्व आयुष्य समजावून घ्या. त्यांनी स्वतःच्या विकासासाठी, स्वतःला बदलण्यासाठी, स्वतःला अधिक समृद्ध बनवण्यासाठी किती वेळ दिला आहे यावर विचार करा.

# गंगेइतकीच पवित्र सरस्वती नदी; कशी झाली लुप्त? जाणून घ्या संपूर्ण इतिहास



पौराणिक मान्यतांनुसार, सरस्वती नदी गंगेइतकी पवित्र मानली जात आहे आणि ती त्या सभ्यतेचे प्रतीक आहे ज्याच्या किनाऱ्यावर मानवतेची सुरुवात झाली. परंतु आज, सरस्वती नदी लुप्त झाल्याचे मानले जाते. तिचा उगम हिमालयात होतो, पण तिचे ठसे गुजरात, हरियाणा, पंजाब आणि राजस्थानमधून सापडतात. ज्या नदीला एकेकाळी महाकाय नदी मानले गेले, ती आज फक्त काही ठिकाणी एक पातळ धारा बनून दिसते. भूगर्भीय बदलांमुळे सरस्वती नदी लुप्त झाली असावी, असाही अंदाज व्यक्त केला जातो. काही लोक अजूनही मानतात की सरस्वती नदी पृथ्वीच्या खाली वाहते आणि थार वाळवंटाच्या खाली शोधलेली नदी सरस्वती नदीच असू शकते.

रामायणात देखील सरस्वती नदीचा उल्लेख आहे. वाल्मीकि रामायणात भरत अयोध्येला येताना सरस्वती आणि गंगा नद्यांचा पार करण्याचा उल्लेख केलेला आहे. ह्याच संदर्भात एक श्लोक आहे ज्यात भरत अयोध्येला येताना सरस्वती आणि गंगा नदी पार करत असल्याचे वर्णन आहे. हे देखील दर्शविते की सरस्वती नदीचा महत्त्व त्या काळात फार मोठा होता. महाभारत कालीन कथांनुसार, दुर्वासा ऋषीने सरस्वती नदीला शाप दिला होता की ती कलियुगाच्या सुरुवातीपर्यंत लुप्त होईल आणि फक्त कल्कि अवताराच्या काळातच तिचा पृथ्वीवर पुनरागमन होईल. त्यामुळे सरस्वती नदीची गाथा फक्त एक नदीच्या अस्तित्वापर्यंत मर्यादित नाही, तर ती एक धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून देखील महत्त्वपूर्ण आहे. या नदीच्या लुप्त होण्याचे कारण आजही एक रहस्य आहे.

विटामिन बी १२ ची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात करा मुगाच्या खिचडीचे सेवन, वाचा सोपी रेसिपी

अनेक शास्त्रज्ञ आणि इतिहासकार या नदीच्या अस्तित्वाच्या आणि लुप्त होण्याच्या बाबतीत शोध घेत आहेत, परंतु त्याचा खरा ठाव ठिकाण अजूनही समजून येत नाही. काही लोकांचा विश्वास आहे की सरस्वती नदी भूगर्भात अजूनही वाहत आहे आणि याचे संकेत थार वाळवंटातील काही जलस्त्रोतांमधून मिळाले आहेत. यावर विविध संशोधन कार्य सुरू आहे, पण तरीही सरस्वती नदीच्या गाथेचा यथार्थ ठाव अद्याप हाती आलेला नाही.

सरस्वती नदी भारतीय पौराणिक कथांमध्ये अत्यंत महत्त्वाची असून तिचा उल्लेख ऋग्वेद, महाभारत आणि रामायणात केला आहे. या नदीच्या लुप्त होण्याचे कारण आजही एक रहस्य आहे, ज्यावर अनेक शोध चालू आहेत.

हिंदू धर्मात नद्या प्राचीन काळापासून पूजनीय मानल्या जातात, त्यात गंगा, यमुनाचं, नर्मदा आणि सरस्वती नदी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. सरस्वती नदीला गंगेइतकी पवित्र मानली जाते आणि ती आपल्या सभ्यतेच्या आणि वारशाच्या सुरुवातीनं असलेल्या नदी आहे. वेदांमध्ये सरस्वती नदीचा उल्लेख आहे, विशेषतः ऋग्वेद आणि महाभारत मध्ये. ऋग्वेदात नदी सूक्तामध्ये सरस्वती नदीला नदीतमा' म्हटले गेले आहे, म्हणजे नद्यांच्या सर्वांत उच्च आणि पवित्र असलेल्या नदीला सरस्वती मानले गेले आहे. ऋग्वेदात सरस्वती नदीला यमुनाच्या पूर्व आणि सतलजच्या पश्चिमेतील मार्गावर वाहणारी नदी दाखवली आहे.

मेंदूमध्ये झपाट्याने वाढत आहेत रक्ताच्या गाठी, शरीर देत असतो हे संकेत; चुकूनही दुर्लक्ष करू नका

# शेतकरी होईल मालमाल; गहू-ज्वारी नव्हे तर ‘हे’पीक देईल सर्वाधिक नफा

पारंपारिक शेतीपेक्षा राजमा लागवडीतून जास्त नफा मिळतो हे पूर्णपणे खरे आहे. गेल्या वर्षी २ एकर जमिनीत राजमाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना सुमारे ८० हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला.

कठोर परिश्रम आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर सध्या देशभरातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. एकेकाळी खडकाळ आणि मुरुम असलेल्या जमिनीतही अंकूर फुटू लागले आहेत. खडकाळ जमिनीत शेतीपिक घेऊ शेतकरी ही खडकाळ जमिनीलाही समृद्धीचे स्रोत बनवले आहे. देशभरातील शेतकरी वेगवेगळी पारंपरिक पिके घेत असतानाच या पारंपरिक पिकांना आता पर्यायही मिळू लागले आहेत. यातलाच एक पर्याय म्हणजे राजमा. पारंपरिक पीक घेण्यासोबतच शेतकरी आता राजमा पिकाची लागवड करून समृद्धीच्या दिशेने जाऊ लागले आहेत.

शेतकरी पारंपारिक शेतीला एक नवीन दिशा देऊ लागले आहेत. बाजारात राजमालाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांची स्वावलंबनाकडे वाटचाल करू लागले आहेत. म्हणूनच शेतकऱ्याचा आता इतर पिकांसह राजमा लागवड वाढवण्यासाठी प्रयत्न करू लागले आहेत. जर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर योग्य दिशेने केला तर शेतकरी प्रगत शेती करून समृद्ध होऊ शकतात, हेही, शेतकऱ्यांनी सिद्ध केलं आहे.



खडकाळ- मुरूमाच्या जमिनीत राजमाची लागवड

पूर्वी, गहू, मका आणि भात यांसारखी पारंपारिक पिके वाळूच्या जमिनीत घेतली जात होती, परंतु कमी उत्पादन आणि घटत्या नफ्यामुळे शेतकऱ्यांना या पिकांपासून नुकसान सहन करावे लागले. मग शेतकऱ्यांनी तज्ञांच्या सल्ल्यानुसार आणि नवीन प्रयोगांशी समन्वय साधून वाळूच्या जमिनीत राजमाची लागवड सुरू केली. हा प्रयोग केवळ यशस्वी झाला नाही तर शेतकऱ्यांना खूप चांगला नफाही मिळाला.

बाजारात किंमत प्रति क्विंटल ८५०० ते १० हजार रुपये

राजमाच्या गुणवत्तेमुळे गेल्या काही दिवसांपासून बाजारात मागणी वाढली आहे. याशिवाय, सरकारी शाळांमधील शालेय मुलांना राजमाची भाजी देखील दिली जात आहे. स्थानिक बाजारपेठेसोबतच ते राज्याबाहेरही पाठवले जात आहे. म्हणूनच व्यापारी चांगल्या किमतीत ते खरेदी करण्यासाठी गावोगावी पोहोचत आहेत. खुल्या बाजारात त्याची किंमत प्रति क्विंटल सुमारे ८५०० ते १०००० रुपये आहे.

जीवघेण्या ऋइड मुळे पुण्यात ५९ लोक रुग्णालयात तर १२ वेंटिलेटरवर

कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनीही शेतकऱ्यांना राजमा लागवडीसाठी प्रोत्साहित केले. त्यांनी माती परीक्षण, बियाणे वितरण आणि शेतीच्या आधुनिक पद्धतींचे प्रशिक्षण दिले. याचा परिणाम असा आहे की शेतकरी आधुनिक शेती करून राजमापासून चांगले उत्पन्न मिळवत आहेत.

राजमा शेतीतून मिळवा जास्तीत जास्त नफा

पारंपारिक शेतीपेक्षा राजमा लागवडीतून जास्त नफा मिळतो हे पूर्णपणे खरे आहे. गेल्या वर्षी २ एकर जमिनीत राजमाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना सुमारे ८० हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला. वाळूच्या जमिनीत राजमाचे उत्पादन खूप चांगले येते. यामध्ये सिंचनाची गरजही कमी आहे. राजमा शेती शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरत आहे. सिंचनासाठी उच्च दर्जाचे बियाणे, सेंद्रिय खते आणि ठिबक सिंचन प्रणाली वापरताना दिसत आहेत. राजमाची लागवड यशस्वी करण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रांचा अवलंब केल्यामुळे ते समृद्ध होऊ लागले आहेत.

# जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने हळदी कुंकू महोत्सवास आज शनिवारपासून प्रारंभ-सौ. सीताताई बनसोड

## शहरातील माता व भगिनींनी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा-हरूणभाई इनामदार

केज/प्रतिनिधी जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने हळदी कुंकू महोत्सवास शनिवारपासून प्रारंभ करण्यात येत आहे तरी शहरातील महिलांनी या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई रुणभाई इनामदार यांनी केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, गेल्या अनेक वर्षापासून जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून व हारुणभाई इनामदार यांच्या संकल्पनेतून केज शहरांमध्ये नारी महोत्सव आयोजित करण्यात येत आहे यामध्ये महिलांसाठी हळदीकुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे त्याचाच एक भाग म्हणून यावर्षी केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली हळदी कुंकू महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. केज शहरातील माता भगिनी या माझ्या कुटुंबाच्या घटक आहेत



त्यांचा सन्मान करण हे आमचे कर्तव्य आहे. या कार्यक्रमामधून महिलांना संवाद साधता यावा व एकमेकांचे हितगुज एकमेकांना साधता यावे असा या कार्यक्रमाचा उद्देश आहे असे हरून भाई इनामदार यांनी माध्यमाशी बोलतानी स्पष्ट केले आहे. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, महिला स्वतःच्या व्यवसायात व कुटुंबाच्या कामात व्यस्त असतात व महिलांसाठी मकर संक्रांतीचा सण फार महत्त्वाचा असतो व मला माझ्या माता व भगिनींची सेवा करण्याची एक संधी मिळावी म्हणून केज शहरांमध्ये चार ठिकाणी हळदीकुंकू महोत्सवाचे आयोजन केजच्या कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे तरी शहरातील माता व भगिनींनी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन हरूणभाई इनामदार यांनी केले आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड म्हणाल्या की, केज शहरातील सर्व महिलांना आमच्या जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने हाळदी कुंकू महोत्सवामध्ये सहभागी व्हावे याकरिता आम्ही शहरातील चार ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे तरी सर्व महिला भगिनींनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याकरिता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी त्यांनी सर्वांना विनंती केली आहे. पुढे बोलताना बनसोड म्हणाल्या की, हळदी कुंकू महोत्सव हा शनिवार दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी ठीक दुपारी २-०० वाजता शहरातील महात्मा फुले नगर भागातील जे.के. फंक्शन हॉल येथे सुरुवात करण्यात येणार आहे या कार्यक्रमास वार्ड क्रमांक ६, ७, ८ व ९ मधील महिलांनी सहभागी व्हावे. रविवार दिनांक २६ जानेवारी रोजी दुपारी २-०० वाजता नगरपंचायत कार्यालय येथे या परिसरातील महिलांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे. सोमवार दिनांक २७ जानेवारी रोजी दुपारी २-०० वाजता मुक्ताई मंगल कार्यालय धारूर चौक येथे या परिसरातील महिलांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे. बुधवार दिनांक २९ जानेवारी रोजी दुपारी २-०० वाजता जय भवानी कन्या प्रशाला कानडी रोड या ठिकाणी या भागातील महिलांनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड यांनी केले आहे.

# माहितीच्या अधिकाराला सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज यांनी दाखवली केराची टोपली

## उपअभियंता श्री मळेकर व शाखा अभियंता श्री कांबळे यांना नागरिकांचे फोन उचलण्याची ऍलर्जी काय?-नागरिकांचा सवाल

केज/प्रतिनिधी -माहितीच्या अधिकाराला सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज यांनी केराची टोपली दाखवली आहे तर उपअभियंता श्री मळेकर व शाखा अभियंता श्री कांबळे यांना नागरिकांचे फोन उचलण्याची ऍलर्जी आहे काय? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहितीच्या अधिकारात माहिती मागवली असता उप अभियंता श्री मळेकर व शाखा अभियंता श्री कांबळे यांनी सदर माहितीच्या अधिकारामध्ये मागवलेली माहिती ही अर्जदारास दिली नाही. अर्जदाराने मागील ३८ ते ३९ दिवसापूर्वी सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालय केज येथे माहितीचा अधिकारात अर्ज देऊन माहिती मागवली होती सदर मागवलेली माहिती अद्यापही अर्जदारास देण्यात आलेली नाही.



अर्जदार हा सदर कार्यालयास गेल्या अनेक दिवसांपासून अनेक वेळा चकरा मारत आहे.परंतु या कार्यालयामध्ये उपअभियंता श्री मळेकर व शाखा अभियंता श्री कांबळे हे उपस्थित नसतात. अनेक वेळा अनेक नागरिक कामानिमित्त उपअभियंता श्री मळेकर व शाखा अभियंता श्री कांबळे यांना त्यांच्या मोबाईल दूरध्वनीवर फोन करून संपर्क साधण्याचा प्रयत्न करत असतात परंतु उपअभियंता व शाखा अभियंता हे नागरिकांचे फोन घेत नाहीत असे नागरिकांतून बोलले जात आहे. तसेच नागरिकांचे दोन्हीही अधिकारी यांना फोन उचलण्याची ऍलर्जी आहे का काय? असाही सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये एखाद्या नागरिकांनी संबंधित कार्यालयात एखाद्या कामाची माहिती मागवली तर ती माहिती संबंधित अधिकारी यांनी देणे गरजेचे असताना देखील वरील दोन्ही अधिकारी हे माहितीच्या अधिकारातील माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत असे जनसामान्यातून बोलले जात आहे.

तर शासकीय कर्मचारी फक्त नावालाच अधिकारी आहेत काय? असा सवाल आता जनतेतून विचारला जात आहे यावर अधिकारी आपले कर्तव्य पार पाडतील का ? हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

# केज विकास संघर्ष समितीचा मंगळवारी मांजरा नदीपुलावर भव्य रस्ता रोको

केज/प्रतिनिधी -खामगाव-पंढरपूर महामार्गावर केज-कळंब दरम्यान मांजरा नदी पुलाजवळाचा एक किमी नादुरुस्त व अत्यंत खराब रस्ता आणि याच महामार्गावरील येरमळा घाटाखालील असलेला ८०० मीटर नादुरुस्त रस्ता तात्काळ मजबुती व डांबरीकरण करा या मागणीसाठी येत्या मंगळवार दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी केज विकास संघर्ष समितीने या परिसरातील नागरिकांच्या सहभागाने बेमुदत रस्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला आहे. गेली पाच वर्षांपासून वरील रस्त्याचा भाग नादुरुस्त व अत्यंत खराब अवस्थेत आहे. या रस्त्यावरून



दुचाकी, चारचाकी व इतर अवजड वाहनधारकांना वाहने चालवणे अत्यंत त्रासाचे व धोकादायक बनले आहे. आजपर्यंत या रस्त्यावर असंख्य अपघात होऊन अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत तर शेकडो लोक जखमी झाले आहेत. रात्रीच्या वेळी या रस्त्यावर चोऱ्या, लूटमार व इतर प्रकार घडत आहेत. रस्त्यावरील मोठे खड्डे, दगडगोटे व सततच्या उडणाऱ्या धुळीमुळे या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांचे व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या रस्त्यावरील मांजरा नदी पुलाचे काम शासकीय दिरंगाई व इतर कारणाने दीर्घकाळ चालणारे आहे. यासाठी हा रस्ता दुरुस्ती व डांबरीकरण होणे गरजेचे आहे. भविष्यात पूलाचे काम पूर्ण झाले तरी अवजड वाहनधारकांना सध्याचा रस्ता सोयीचा व सुरक्षित असणार आहे त्यामुळे हा रस्ता सध्या तात्काळ मजबुतीकरण व डांबरीकरण होणे गरजेचे आहे. या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने यापूर्वी अनेक उपोषणे, घंटानाद व रस्ता रोको आंदोलने केलेली आहेत. यापूर्वी एमएसआरडीसीने तीन कोटींचा निधी मंजूर करून निविदा काढल्याचे समितीला कळवले होते मात्र आता तीन महिने उलटूनही अद्याप महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने काम सुरू केले नसल्याने अखेर केज विकास संघर्ष समितीने या भागातील नागरिकांच्या सहभागाने येत्या मंगळवारी मांजरा नदी पुलावर बेमुदत रस्ता रोको आंदोलन करणार असल्याची माहिती समितीचे समन्वयक सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिली आहे. या निवेदनाच्या प्रती कळंबचे तहसीलदार, केजचे तहसीलदार, महाराष्ट्र राज्य रस्ते महामंडळ जालना-संभाजी नगर आणि कळंब व युसुफवडगाव पोलीस स्टेशन यांना देण्यात आल्या आहेत. निवेदनावर हनुमंत भोसले, नासेर मुंडे, संपत वाघमारे, शेषराव घोरपडे इत्यादींची नावे आहेत.

# तीन दशकापासूनची मागणी प्रलंबितच. किनवट जिल्ह्याची घोषणा होणार कधी?

किनवट: शेख शौकत :-किनवट मांडवी, इस्लापूर -तालुके व किनवट जिल्हा होणार या चर्चांना डिसेंबर व जानेवारी महिन्यात उधाण येते. २६ जानेवारीनंतर मात्र वर्षभर जिह्याच्या मागणीबाबत कोणी चकार शब्द काढत नाहीत. व्हाट्सअँप ग्रुप इंस्टाग्राम फेसबुक व सोशल मीडियावर तशी कोणतीही पोस्ट व्हायरल होत नाही. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. अलीकडच्या काळात किनवट जिल्ह्याची घोषणा होणार? या चर्चेची पोस्ट सध्या सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे. दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने किनवट जिल्ह्याची घोषणा होणार या चर्चांना पेव फुटते. किनवट जिल्हा होणार म्हणून सर्वत्र चर्चा सुरू झाली की प्लॉटिंगचे भाव वाढतात. बेभाव प्लॉटची खरेदी करून गरजवंत मोकळे होतात. मात्र, अजूनही किनवटला जिल्ह्याचा दर्जा मिळालेला नाही. असे असताना महाराष्ट्रात एक नवा जिल्हा उदगीरच्या रूपाने मिळण्याच्या चर्चेला उधाण आले आहे. व्हॉट्सअँप इंस्टाग्राम फेसबुक व इतर सोशल मीडियावर या पोस्ट पाहायला मिळाल्या. मात्र, किनवटचा साधा उल्लेखही नसल्याने राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असून राजकीय अनास्थेमुळे आणि जनतेचा रेटा कमी पडल्याने किनवट जिल्ह्याची मागणी शासन दरबारी प्रलंबितच असल्याचे बोलले जात आहे. मात्र शासनाकडून जिल्हा निर्मितीची अपेक्षा होत आहे. जानेवारी महिन्यात चर्चाला उधाण का बरे येते? :किनवटला जिल्हा करा व मांडवी, इस्लापूर हे दोन नवीन तालुके निर्माण करा, ही मागणी गेल्या तीन दशकांपासूनची आहे. गडचिरोलीच्या धर्तीवर किनवट या आदिवासी तालुक्याला जिल्ह्याचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी आहे. या मागणीसाठी किनवट जिल्हा निर्मिती कृती समिती स्थापन केली आहे; पण त्यांच्या हालचाली नसल्याने ही समिती नावालाच आहे. शासनाने मांडवी व इस्लापूर हे दोन तालुके व किनवट जिल्हा २६ जानेवारीला घोषित करून किनवटकरांना सुखद धक्का देईल का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय महामार्गावर कमी अंतरावर खड्डे,ही खड्डे,वाहनचालकांना करावा लागतो अडचणींचा सामना



किनवट: शेख शौकत –राष्ट्रीय महामार्गावर गेल्या सात वषार्पासून अनेक जागी कामा सुरूच आहेत. तसेचधनोडा–माहूर–किनवट–कोठारी–चिखली–बोधडी–इस्लापूर–हिमायतनगर राष्ट्रीय महामागाचे सिमेंट रस्त्यात खड्डे झाल्यामुळेअनेक ठिकाणी अपघात होऊन नागरिकांचा जीव गेलेला आहे. घातक वळणाच्या ठिकाणी रस्ता सरळीकरण केला गेला नसल्यानेही अनेक अपघात घडून नागरिकांचा जीव गेल्याची उदाहरणे आहेत. अनेक ठिकाणी पूल वाकडे बनविण्यात आल्याने येथेही अपघात घडत आहेत. तसेच रोडच्या दोन्ही बाजूला मुरूम अनेक ठिकाणी भरलेला दिसून येत नाही. तसेच माहूर धानोडा केरोळी घाटात घातक वळणे जशास तसे ठेवल्याने वाहने एकमेकांच्या अंगावर जात असल्याने मोठाले अपघात घडत आहेत, परंतु याकडे राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत. माहूर शहर असो की किनवट शहर फुटपाथ लाईट पेव्हर ब्लॉकची कामे अर्धवट आहेत. त्यामुळे हजारो भाविकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मालवाडा घाटात एकेरी रस्ता अर्धवट बनविला असून एक थर टाकल्याने त्या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले आहेत. एकेरी रस्त्यालगत मोठाले काटेरी झुडपे उगवल्याने वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. एकीकडे झुडूपाचा त्रास तर दुसरीकडे समोरून येणाऱ्या वाहनाला धडक लागण्याची भीती त्यामुळे वाहनधारकाना या घाटातून जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. दुसऱ्या बाजूला चार ते पाच फूट खोल दर निर्माण झाली असून कुठल्याही परिस्थितीत वाहन रस्त्याच्या खाली उतरवता येत नाही. त्यामुळे या रस्त्यावरील काटेरी झुडुपे काढून रस्त्यातील खड्डे बुजवून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला मुरूम टाकून वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी त्रस्त वाहनधारकांकडून होत आहे. माहूर शहरातून सारखणी– किनवट,कोठारी–चिखली– बोधडी–इस्लापूर– हिमायतनगर–नांदेडकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या माहूरला लागून मालवाडा घाटातील रस्त्याचे काम वनविभागाने थांबविल्याने एकेरी रस्ता अर्धवट झाला असून रस्त्यावर वरचा थर टाकला नसल्याने मोठाले खड्डे पडले आहेत त्यामुळे अवजड वाहनांना कसरत करावी लागत आहे तर एसटीचेही अपघात झाले असून मोटरसायकल स्वरांचे दररोज अपघात घडत आहेत एकेरी रस्त्याच्या बाजूला उगवलेली काटेरी झुडपे काढून दुसऱ्या बाजूच्या रस्त्यावर किमान मुरूम तरी टाकावा अशी मागणी त्रस्त वाहनधारकातून होत आहे.

## मी लोकशाहीचा पाठीराखा असून कोणत्याही आकारात आणि पद्धतीत असलेल्या एकाधिकारशाहीचा विध्वंसक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

### ८७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने १९ जानेवारी २०२५ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालयात ८७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.



या कार्यशाळेला उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते रामदास मगरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका जिल्हाधिकारी झालेल्या नवयुवकाला तो ज्या गावातून आला होता त्या गावात रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी लाल दिव्याच्या गाडीतून फेरफटका मारला पाहिजे असे सांगितले होते. जेणेकरून इतरही दर्शक महिलांना आपली मुले जिल्हाधिका–या सारख्या उच्च पदावर विराजमान व्हावीत, अशी प्रेरणा मिळू शकेल. आपली प्रगती ही शिक्षणाने व बौद्ध धर्म स्विकारल्याने झाली आहे. अनुसूचित जातीतील इतरही जातींनी हाच कित्ता गिरविला असता आणि उच्च शिक्षण घेऊन धम्म स्विकारला असता तर त्यांचीही प्रगती झाली असती.

याप्रसंगी अशोक मेश्राम म्हणाले की, काही लोक म्हणतात संविधानाला कुणी हात लावू शकत नाहीत? जे हात लावील त्याचे हात छाटले जातील. तर अनेक राज्यकर्त्यांनी भारताचे संविधानाची अंमलबजावणी केली नाही, तेव्हा ही माणसे कुठे गेली होती? आर्थिक विषमता फोफावत असताना समतेवर कुणी बोलायला तयार नाहीत. गोविंद कांबळे म्हणाले की, धर्म ही अफूची गोळी आहे, असे म्हटले जाते. ती आपण वैयक्तिक बाब म्हणून घरात पाळली पाहिजे. आपण बाबासाहेब आंबेडकरांना मानत असलो तरी बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना मानतो काय? यांवर विचार केला पाहिजे. संतोष खरात म्हणाले की, विहारात वंदनेसह ज्ञानदानाचे कार्य झाले पाहिजे. पुढे जाणाऱ्याला सहकार्य केले पाहिजे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, आपण संघटीत नसल्याने समस्याग्रस्त आहोत. ज्यामुळे सर्वत्र नंगानाच पहायला मिळतो. आयकर भरणाऱ्यांचा पैसा नेमका जातो कुठे? यांचा वैचारिक ताळेबंद मांडला पाहिजे. अन्यथा एकाधिकारशाही फोफावत राहील. प्रमोद डोंगरे म्हणाले की, समाजातील अनेक श्रीमंत लोक सुद्धा चळवळीचे कार्य करताना दिसत नाहीत. मात्र बी. बी. मेश्राम यांनी चळवळीच्या कार्याला वाहून घेतले आहे, हे वाखाणण्याजोगे आहे. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, तळागाळातील लोकांना आपल्या हक्क अधिकाराचे फारसे गांभीर्य नसते त्याविषयी आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत आपली भूमिका मांडली होती. आंबेडकरांचे विचार कृतीशीलतेने आचरणात आणले पाहिजे. चला भारत बौद्धमय करण्यासाठी प्रयत्न करूया. महादेव डांबरे म्हणाले की, अस्पृश्य समाजाचे दुखणे जगाच्या वेशीवर टांगणारे बाबासाहेब पहिले नेते होते. आपल्या लोकांना राजकीय संरक्षण मिळण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. प्रतीक पंचशील म्हणाले की, सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. शासक होण्यासाठी सामान्य बाबी सोडून असामान्य कार्य करावे लागते.

प्रमुख वक्ते संजय बन्सवाल म्हणाले की, प्रशिक्षित कार्यकर्ते बनविण्यासाठी हा एक कॅडर कॅम्पच आहे. डॉ. आंबेडकरांनी आपणास मताचा अधिकार, राजकीय पक्ष व आचरणासाठी धम्म दिला आहे. त्यांना जोपासन्यासाठी गैरराजनीतीक मुळे मजबूत केली पाहिजेत. मराठा समाजातील जागृती ही साहित्यिक प्रा. मा. म. देशमुख व बामसेफची देण आहे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, जनतेला दारिद्र्यातून बाहेर काढून राज्य करने व दारिद्र्यात खितपत ठेवून राज्य करने या दोन्ही बाबी भिन्न भिन्न आहेत. बहुतांश वेळा अनेक जण आपल्या रक्त नात्यातील सदस्यांना सुद्धा नीट ओळखत नसतात. ते शेजा–यांशी व समाजातील इतरांशी मैत्री भाव, बंधूंभाव कसा स्थापित करू शकतील? म्हणजे काय त्या परिवारातील सदस्य सुद्धा तथागत बुद्ध व बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या विरोधात कृतीशील असतात? जनतेच्या हक्क अधिकारासाठी जनते पेक्षा नेते जास्त जागृत असायला हवेत. जेणेकरून ते सभागृहात संबंधित समस्यांवर चर्चा घडवून निर्णय करायला भाग पाडतील.

काय खरेच सामाजिक सुधारणांना दीर्घ काळ लागत असतो? नाही, ज्या प्रमाणात प्रयत्न केले जातील त्याच प्रमाणात काळ लागत असतो. करिता आपण आपल्या प्रतिनिधींना त्यांच्या उत्तरदायित्त्वावर प्रश्न विचारले पाहिजेत. जेणेकरून त्यांना आपल्या प्रतिनिधित्वाची व जबाबदारीची सातत्याने जाणीव होत राहील. करिता जीवनाच्या सर्व क्षेत्रात संवैधानिक समूहांना पर्याप्त प्रतिनिधित्व बहाल करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. म्हणून नीती व रणनीती निश्चित केली पाहिजे. जेणेकरून लोकशाहीचे संवर्धन होऊन सर्व क्षेत्रातील एकाधिकारशाही संपुष्टात येऊ शकेल. म्हणून आपण आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे मी लोकशाहीचा पाठीराखा असून कोणत्याही आकारात आणि पद्धतीत असलेल्या एकाधिकारशाहिचा विध्वंसक आहे. या विषयावर चर्चा आयोजित केली आहे.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे व आभार गोविंद कांबळे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, इंजिनिअर किशोर हिरामण पाटील, महादेव डांबरे, संजय बन्सवाल, रामदास मगरे, राजेंद्र बनसोडे, प्रमोद डोंगरे, अशोक मेश्राम, साधू आनंद, उद्योजक मिलिंद बागूल, प्रतिक पंचशील, चंद्रशेखर झोडे, राहूल पाटील, संतोष खरात, डी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे गोविंद कांबळे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

## मानव जातीच्या कल्याणासाठी सोमयाग महत्त्वाचे : गहिनीनाथ महाराज औसेकर



औसा / प्रतिनिधी :–जगाच्या कल्याणासाठी संतांचे कार्य जसे महत्त्वाचे आहे. त्याप्रमाणे यज्ञाहुतीही महत्त्वाची आहे हा योग सेलू येथे आल्यामुळे भाविकांना याचा नक्कीच लाभ मिळेल असे प्रतिपादन गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी आपल्या कीर्तन सेवेतून केले. सेलू ता. औसा येथे गेल्या दोन दिवसापासून वाशिष्ठ चतुरास्त्र महा सोमयाग सोहळा पार पडत आहे. सोम्यागाच्या कीर्तन सेवेमध्ये ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांची कीर्तन सेवा झाली. त्यांनी आपल्या कीर्तन सेवेतून *आवडे हे रूप गोजिरे, सगुण पाहता लोचन सुखावले आता दृष्टी पुढे ऐसा तोची राहे जो मी तुझं पाहे पांडुरंगा लाचावले मन लागले शी गोडी ते जिवे न सोडी ऐसे झाले तुका म्हणे आम्ही मागावी लडिवाळे पूर्वावी आळी मायबाप* या अभंगावर आपल्या अभ्यासपूर्ण सुंदर रसाळ कीर्तन सेवा केली. यातून त्यांनी वेदातील चार वेदांमध्ये सामवेद आहे त्याप्रमाणे सोमयागाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. गेल्या १२५ वर्षापासून महा सोमयागाची परंपरा यज्ञेश्वर महाराज सेलुकर हे पुढे चालवत आहेत. हे सेलुगावासह बुधोडा, औसा, खुंटेगाव, हासेगाव, पंचक्रोशी मध्ये अभिमानाची बाब आहे. आणि आपल्या गावामध्ये या सोमयागाची आहुती दिली जाणे हाही योगायोग आहे. या सोमयागाच्या महतीमुळे श्री यज्ञेश्वर महाराज सेलुकर यांनी सेलु या गावाचे नांव पंचक्रोशीतच नाही तर महाराष्ट्रा सह देशभरात पोहंचवीले आहे. असे सांगीतले. या कीर्तन सेवेला पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. किर्तन सेवेच्या सुरुवातीला यज्ञ सेवा समितीच्या वतीने ॲडव्होकेट अरविंद कुलकर्णी यांनी महाराजांचे स्वागत केले. शुक्रवार दि. २४ जानेवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. कीर्तन सेवेला आणि धार्मिक कार्यक्रमाला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## हिंदी भाषेत बोलले म्हणून राज ठाकरेंनी दादागिरी करू नये

मुंबई : केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत २ मार्चला बुद्धिस्ट परिषद होणार आहे. नाशिक येथे होणा–या या परिषदेत विविध सामाजिक प्रश्नांवर चर्चा होईल. या निमित्ताने पक्षाचा संघटनात्मक विस्तार करण्याचा प्रयत्न आहे.

या संदर्भात केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी विविध प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांनाही सल्ला दिला. विविध राजकीय प्रश्नांवर त्यांनी आपले मत व्यक्त केले. मुंबईत परप्रांतीयांचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेला आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. काही ठिकाणी घडलेल्या दादागिरीच्या घटनांना मनसेने चोख उत्तर दिले. याबाबत राज्यमंत्री आठवले यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांना थेट सल्ला दिला.



आठवले म्हणाले, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे विविध भागातून येथे लोक उद्योग, व्यवसाय आणि विविध कारणांनी येतात. देशाच्या विविध भागातील नागरिक आणि भाषा व संस्कृती असलेले लोक मुंबईकडे आकर्षित होतात. राज ठाकरे यांनी अशा लोकांवर दादागिरी करू नये. मराठी भाषा आलीच पाहिजे. त्यासाठी त्यांना मराठी शिकण्याची मुभा द्यावी. मात्र सक्ती करू नये. कोणी हिंदीत बोलल्यास मनसेने त्यांच्यावर दादागिरी करू नये, हे प्रकार थांबवावे.

राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार आणि शरद पवार हे पक्ष एकत्र येण्याची शक्यता नाही. महायुतीचा घटक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष सत्तेत सहभागी झाला आहे. त्यामुळे आता शरद पवार यांनी देखील एनडीएला पाठिंबा द्यावा. पवार यांनी एनडीएमध्ये सहभागी व्हावे, असे आठवले म्हणाले. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे देखील 'एनडीए'मधून बाहेर पडणार नाहीत. त्यांचा केंद्रातील पंतप्रधान मोदी सरकारला पाठिंबा कायम राहील. या संदर्भात माध्यमांतून होणा–या चर्चा निराधार असल्याचा दावाही राज्यमंत्री आठवले यांनी केला.

# अतिक्रमण अधिकारी रोहित ठाकरे यांची बदली करा सामाजिक कार्यकर्ते सुबोध सावंत यांची आयुक्तांकडे मागणी

नवी मुंबई / के. एच. हनवते :– कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या बदलीचे शासनाकडून विशेष निकष निर्गमित केले गेले आहेत. त्या अनुषंगाने बदल्या करणे अनिवार्य आहे. नवी मुंबई महानगरपालिकेतील प्रशासन विभागाने कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या अभियंत्यांच्या बदल्या केल्या. परंतु तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी मध्ये एकच ठिकाणी कार्यरत असलेल्या घणसोली विभाग कार्यालयातील अतिक्रमण अधिकारी रोहित ठाकरे यांची बदली न केल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.यामुळे त्यांची बदली करा.अशी लेखी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुबोध सावंत यांनी मनपा आयुक्तांकडे केली आहे. शासनाकडून स्थलांतरित बदली संदर्भात बदली करण्याचे काही अटी व नियमावली आहे.त्यामध्ये अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आणि अ, ब व क गटातील राज्यशासनाच्या नेमणुकीच्या सर्व सेवक यांच्याकरीता एखादया पदावर असण्याचा सामान्य कालावधी ३ वर्षाचा आहे. परंत असा कर्मचारी सेक्रेटीअर सेवेत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी त्याच पदावर ठेवण्यात येणार नाही आणि लागोपाठ २ पदावधीपेक्षा अधिक पदावधीसाठी त्याला त्याच विभागात ठेवण्यात येणार नाही अशा प्रकारची नियमावली म्हणते. तसेच सक्षम प्राधिकारी प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात त्या वर्षी एप्रिल ते मे महिन्यात बदलीसाठी पात्र होतील. अशा शासकीय कर्मचाऱ्यांची यादी तयार करेल असे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, मे १२, २००६ महाराष्ट्र अधिनियम क्र. २१ नुसार म्हटले आहे.या प्रकारचा नियम असताना देखील घणसोली विभाग कार्यालयातुन रोहित ठाकरे यांची बदली का झाली नाही? असा सवाल आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच एका अधिकाऱ्याची बदली तीन वर्षाने करणे नागरीकांना सेवा देणे व भ्रष्टाचाराला आळा घालण्याकरीता बंधणकारक आहे.



परंतु माहिती अधिकारांतर्गत माहिती मागिवली असता घणसोली अतिक्रमण विभागात कार्यरत असणारे रोहित ठाकरे यांची सन २०२१ ते २०२५ पर्यंत यांची दोन वेळा बदली झाली असता त्यांना जुन २०२१ रोजी नेरूळ विभागामध्ये बदली झालेली दिसुन येते. परंतु त्याच महिन्याअखेरीस त्यांची बदली घणसोली विभाग अतिक्रमण येथे करण्यात आली असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच ज्या कालावधीमध्ये रोहित ठाकरे घणसोली अतिक्रमण विभागात काम करत असताना सर्वात जास्त अतिक्रमण व अनधिकृत इमारतीचे बांधकाम झालेले दिसुन येते. सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण आजतागायत सुरू आहे. तसेच भूमाफिया व रोहित ठाकरे यांची भागिदारी असल्याचे आढळुन आलेले आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिका एकाच विभागामध्ये 'संबंधीत अभियंता यांना वारंवार नियुक्ती करून भ्रष्टारात मोठ्या प्रमाणात साथ देत असल्याचे आयुक्तांना दिलेल्या तक्रार पत्रात म्हटले आहे. कोट... ठाकरे अनधिकृत इमारती बांधकाम होण्यामध्ये वाढ होण्यास मदत करत आहेत. त्यामुळे मी एक सतर्क नागरिक तसेच पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता तथा पशुप्रेमी असल्याने या गोष्टीची खंत वाटते त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका अधिनियम अंतर्गतचे कारवाई करावे. तसेच केलेल्या कारवाईबाबत मला नागरिकांची सनद अधिनियम कारवाई अंतर्गत माहिती मिळावी. अशी मी आयुक्तांकडे मागणी केली आहे. सुबोध सावंत, पत्रकार व पर्यावरण सामाजिक कार्यकर्ता तथा पशूप्रेमी, नवी मुंबई.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE